THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 9TH FEBRUARY 1893.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**सन १८९१चा पेढीवाल्यांच्या वह्या पुराव्यास घेण्याचा आक्ट याचे ठराव सेव्हिंग्स ब्यांकींसंबंधी किंवा मनी आर्डरींसंबंधी काम करणाऱ्या पोस्ट आफिसांच्या वह्यांस लागू करण्यासाठीं आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थीं सन १८९१ चा पेढीवाल्यांच्या वह्या पुराव्यास घेण्याचा आक्ट याचे ठराव सेव्हिंग्स ब्यांकसंबंधी किंवा मनीआर्डरसंबंधी काम करणाऱ्या पोस्ट ऑफिसांच्या वह्यांना लागू करणें योग्य आहे; त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) या आक्टास सन १८९३ चा पेढीवाल्यांच्या वह्या पुराव्यास घेण्याचा आक्ट असें ह्मणावें; आणि (लहान सरनामा व सुरुवात.)

(२) तो एकदम अमलांत येईल असें समजावें.

२. सदर्हू सन १८९१चा पेढीवाल्यांच्या वह्या पुराव्यास घेण्याचा आक्ट याच्या २ऱ्या कलमाच्या (२) ऱ्या पोट-कलमाची रकम (ब) हिच्यानंतर खालीं दिलेली रकम दाखल करावी, ह्मणजे:— (सन १८९१ ऱ्या १८ व्या आक्टाचें कलम २, पोट-कलम (२) यांतील "पेढी" व "पेढीवाला" या शब्दांचे व्याख्येंत ज्यास्त मजकूर दाखल करणें.)

" (क) सेव्हिंग्स ब्यांकेच्या किंवा मनीआर्डरींच्या कामाच्या संबंधानें तसें काम करणारें कोणतेंहि पोस्ट ऑफिस".

---

### हेतु व कारणें यांचें निरूपण.

या मसुद्याचा हेतु ह्मटला ह्मणजे पेढीवाल्यांच्या वह्या पुराव्यास घेण्याचा आक्ट (सन १८९१ चा १८ वा) याचे ठराव सेव्हिंग्स ब्यांकेसंबंधी किंवा मनीआरडरींसंबंधी काम करणाऱ्या पोस्ट आफिसांच्या वह्यांना लागू करणें हा होय. सन १८९१च्या १८व्या आक्टाच्या मसुद्याचा ज्या वेळीं तत्संबंधी सिलेक्ट कमिटीपुढें विचार झाला त्यावेळीं, सदर्हू प्रकारच्या वह्या ह्या सन १८७२ च्या हिंदुस्थानच्या पुराव्याच्या आक्टाच्या ७४ ऱ्या

कलमाच्या अर्थाप्रमाणें सार्वजनिक दस्तऐवज असून त्या आक्टाच्या ६५व्या कलमाखालीं येतात असें त्या सिलेक्ट कमिटीनें समजून त्यांचा त्या मसुद्यांत समावेश करण्याविषयीं शिफारस केली नाहीं. परंतु त्या सलेक्ट कमिटीची कायद्याच्या ज्या मुद्यावर सदर्हूप्रमाणें समजूत झाली त्या मुद्याच्या खरेपणाविषयीं प्रश्न न करतां, सदर्हू राव्याच्या कायद्यावर अवलंबून राहण्यापेक्षां अशा वह्यांचा सदर्हू सन १८९१च्या आक्टांत स्पष्टपणें समावेश केल्यास व्यवहारीक रीत्या फायदा होईल असें डैरेक्टर जनरल ऑफ धि पोस्ट ऑफिस यांनीं सरकारच्या नजरेस आणलें आहे; आणि तो फायदा करून घेण्याच्या हेतूनें हा मसुदा, सदर्हू डैरेक्टर जनरल ऑफ् धि पोस्ट ऑफिस यांच्या विनंतीवरून, करण्यांत आला आहे.

तारीख ११ माहे जानेवारी सन १८९३.

(सही.) आलेक्स. एड्व. मिलर.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.